**<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग</u>**

# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मराठी भाषा गौरव दिन साजरा

**मुंबई, २७** फेब्रुवारी, **२०२१:-** 'कुसुमाग्रज' या नावाने प्रख्यात मराठी साहित्यिक श्री. विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (मुं.मे.रे.कॉ) आज मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. नाटकं, कादंबऱ्या, लघुकथा इत्यादी स्वरुपात मराठी साहित्यात त्यांनी केलेल्या मोलाच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

"मराठी साहित्यात कुसुमाग्रजांनी भरीव योगदान दिले आहे. आज त्यांच्या जन्मदिनानिमित्त्य त्यांना अभिवादन करतो. कुसुमाग्रज यांनी काव्य, नाट्य, कादंबऱ्या व संपादकीय लेखनाच्या माध्यमातून विविध विषयांवर दर्जेदार लेखन केले आहे. यानिमित्ताने आपण सर्वांनी त्यांचे साहित्य वाचले पाहिजे तसेच आपल्या दैनंदिनी कार्यालयीन कामात मराठी भाषेचा वापर अधिकाधिक केला पाहिजे", असे मुं.मे.रे.कॉ.चे संचालक (प्रकल्प) श्री. एस.के. गुप्ता, म्हणाले.

यावेळी संचालक (प्रणाली), श्री ए.ए.भट्ट यांनी कुसुमाग्रजांच्या जीवनावर प्रकाश टाकला तर कार्यकारी संचालक (नियोजन), श्री. आर. रमणा, मराठी साहित्याला समृद्ध करण्यासाठी कुसुमाग्रजांनी दिलेल्या योगदानाविषयी बोलले. महाव्यवस्थापक मा.सं श्रीमती माधवी सरदेशमुख यांनी कुसुमाग्रजांनी लिहिलेली कविता वाचली व आपले मनोगत व्यक्त केले.

कोविड-१९ च्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत मुं.मे.रे.कॉ.चे अन्य अधीकारी व कर्मचारी ऑनलाईन माध्यमाने कार्यक्रमात सामील झाले. *(समाप्त)*

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com